# दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.,

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी-वैजनाथ जि.बीड-४३१ ५१५

रजिस्ट्रेशन नंबर : बीएचआर/बीएनके/बी १०६ दि.२४.२.१९६६

## नोटीस

(केवळ भागधारकांसाठी)

## ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि., परळी वैजनाथच्या सर्व भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दिनांक ३०.०९.२०२१ रोजी सकाळी ठिक १० वाजता बँकेचे मुख्य कार्यालय, परळी-वैजनाथ येथील सभागृहामध्ये व्हीसी किंवा ओएव्हीएम (ऑनलाईन) द्वारे खालील विषयांचा विचार करण्यासाठी भरणार आहे. तरी सर्व भागधारकांना वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभाग घेणे करीता त्यांचे मोबाईलवर एसएमएस द्वारे व इ-मेलद्वारे लॉगईन आयडी व पासवर्ड पाठविण्यात येणार आहे. सभेचे आयोजन ऑनलाईन केले असल्यामुळे सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षीत नाही. सदर सभेस आपण ऑनलाईन उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

| | |
|---|---|
| विषय क्र. १ : | मागील दि.२७/०३/२०२१ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे. |
| विषय क्र. २ : | सन २०२०-२०२१ अखेर वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक संमत करणे. |
| विषय क्र. ३ : | मा.संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सन २०२०-२०२१ सालच्या नफावाटणीस अनुसमर्थन देणे. |
| विषय क्र. ४ : | सन २०२०-२०२१ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्तीच्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२१-२०२२ सालाचे मा.संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकास अनुसमर्थन देणे. |
| विषय क्र. ५ : | सन २०२०-२०२१ वर्षाच्या लेखापरिक्षणाची माहिती घेणे व सन २०१९-२०२० वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची माहितीसह नोंद घेणे. |
| विषय क्र. ६ : | मा.संचालक मंडळाचे मान्यतेनुसार सन २०२१-२०२२ वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षक यांच्या नेमणुकीस अनुसमर्थन देणे. |
| विषय क्र. ७ : | सन २०२०-२०२१ या अर्थिक वर्षात एकरकमी परतफेड कर्ज खात्यांची माहिती घेवून मंजूरी देणे. |
| विषय क्र. ८ : | मा.रिझर्व बँकेचे दिनांक २५.०६.२०२१ रोजीच्या परिपत्रकास अधिन राहून, नोंद घेवून मान्यता देणे. |
| विषय क्र. ९ : | ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे. |
| विषय क्र. १०: | मा.उपाध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे. |

मा.उपाध्यक्ष व संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ : परळी-वैजनाथ

दिनांक :२२.०९.२०२१

(विनोद खर्चे)
मुख्य कार्यकारी अधिकारी

### -: सभासदांना नम्र सूचना :-

१. कोवीड-१९ च्या मार्गदर्शक सुचनानुसार ५० पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास शासनाचे निर्बंध असल्याने ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीसी किंवा ओएव्हीएम (ऑनलाईन) द्वारे घेण्यात येणार आहे. करीता सभासदांनी आपला अॅन्ड्राईड सुविधा असलेला मोबाईल क्रमांक व इ-मेल आयडी बँकेत नोंदवला नसेल तर, नजिकच्या शाखेत दि.२८.०९.२०२१ सायंकाळी ५.०० पर्यंत नोंदवावा. जे सभासद दि.२८.९.२०२१ पर्यंत मोबाईल क्रमांक व इ-मेल आयडीची नोंदणी करतील त्यांना लॉगईन आयडी व पासवर्ड दि.२९.०९.२०२१ रोजी संबंधीत मोबाईल व इ-मेल आयडीवर पाठविण्यात येतील.

२. इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक/लॅपटॉप/ स्मार्ट फोन याद्वारे सभासद, ह्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील.

३. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी ज्या सभासदास सभेपुढे असलेल्या विषयाबद्दल कांही माहिती विचारावयाची असेल त्यांनी दि.२८.०९.२०२१ पर्यंत मुख्य कार्यालयास लेखी कळवावे, तसेच ceo@vaidyanathbank.com या मेल आयडीवर पत्र मेल करणे. पत्र मेल करतांना सभासदांनी स्वतःचा मेल आयडीवर द्यावा म्हणजे त्या मेल आयडीवर उत्तर पाठविले जाईल. अन्यथा त्याचा विचार केला जाणार नाही.

४. आवश्यकता असलेला कोरम सभेच्या सुरुवातीस नसल्यास सभेच्या कामास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी सुरुवात केली जाईल. त्या सभेस पोटनियम ३५ (३) प्रमाणे कोरमची आवश्यकता राहणार नाही.

५. ज्या सभासदांची भाग खरेदी संख्या ८० पेक्षा कमी असेल त्यांनी एकूण ८० भाग (रू.२,०००/-चे) खरेदी करणे पोटनियमाप्रमाणे अॅक्टीव मेंबर म्हणुन पात्रतेस अत्यावश्यक आहे.

६. बँकेचा संपूर्ण अहवाल बँकेच्या संकेत स्थळावर (www.vaidyanathbank.com) उपलब्ध असून सभासदांसाठी अहवालांच्या प्रती बँकेच्या शाखांकडेही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.